# राष्ट्रीय हिंदू आंदोलन

**'हिंदु राष्ट्राच्या स्थापने'साठी कार्यरत हिंदुत्ववादी संघटनांचा संयुक्त राष्ट्रीय उपक्रम !**

**संपर्क : ०९३२२५३३५९५ इ-मेल : hinducoordination@gmail.com**

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

दिनांक : १९ एप्रिल २०१५

प्रति,

मा. संपादक / मुख्य पत्रकार

**कृपया प्रसिद्धीसाठी !**

<u>राष्ट्रीय हिंदू आंदोलनाच्या अंतर्गत फोंडा येथे निदर्शनाद्वारे समस्त हिंदुत्ववादी संघटनांच्या एकमुखी मागण्या</u>

**कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालून मुलांना हिंदु संस्कृतीपासून वंचित ठेवू नका, राज्यघटनेतून 'सेक्युलर' शब्द काढून अल्पंसख्यांकांचे तुष्टीकरण बंद करा !**

फोंडा, १९ एप्रिल - कॉन्व्हेंट शाळांमध्ये हिंदु संस्कृती आणि प्रथा यांचे पालन करण्यास आडकाठी आणल्याचे अनेक प्रसंग घडल्याचे गोव्यात निदर्शनास आले आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालून हिंदु संस्कृतीपासून वंचित ठेवायचे का ?, याचा विचार प्रत्येक हिंदु पालकाने करावा. केंद्रशासनाने देशातील प्राचीन मंदिर आणि किल्ले यांची पडझड रोखून त्यांचे जतन करावे. श्रीमद्भगवत्गीता ग्रंथ जाळल्याप्रकरणी कर्नाटकातील ऊरलिंग मठ्ठाचे ज्ञानप्रकाश स्वामी आणि गीतेच्या अवमान प्रकरणी प्रा. के. एस्. भगवान यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशा एकमुखी मागण्या समस्त हिंदुत्ववादी संघटनांनी राष्ट्रीय हिंदू आंदोलनाच्या अंतर्गत १९ एप्रिल या दिवशी सकाळी फोंडा येथे जुना बसस्थानकाजवळ केलेल्या निदर्शनाद्वारे केल्या. देशव्यापी राष्ट्रीय हिंदू आंदोलनाचा हा एक भाग होता.

स्थानिक श्री झरेश्वरदेवाला नारळ अर्पण केल्यानंतर श्री गणेशाच्या श्लोकाने निदर्शनाला प्रारंभ झाला. प्रारंभी राष्ट्रीय हिंदू आंदोलनाच्या वतीने डॉ. मनोज सोलंकी यांनी आंदोलनासंबंधी प्रस्तावना करतांना आंदोलनाचा उद्देश स्पष्ट केला. यानंतर हिंदुत्वनिष्ठ वक्त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. गोव्यात विविध ठिकाणच्या कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलींना बांगड्या घालण्यास, कपाळाला कुंकू लावण्यास, भारतीय पोशाख घालण्यास, कशा प्रकारे मज्जाव केला जातो, याची उदाहरणे हिंदु पालकांनी या वेळी सांगितली. हिंदु संस्कृती आणि प्रथा टिकवण्यासाठी आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंटमध्ये घालायचे का, याचा विचार प्रत्येक हिंदु पालकाने करावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले. राज्यघटनेत मुळात नसलेला आणि आणीबाणीच्या काळात अनधिकृतपणे घुसडलेला 'सेक्युलर' शब्द काढून अल्पंसख्यांकांचे तुष्टीकरण बंद करावे आणि देशात त्वरित समान नागरी कायदा लागू करावा, अशी मागणीही करण्यात आली. हिंदु जनजागृती समितीचे फोंडा समन्वयक श्री. सत्यविजय नाईक, रणरागिणी शाखेच्या सौ. राजश्री गडेकर, सनातन संस्थेचे श्री. अक्षय परब, हिंदु विधीज्ञ परिषदेचे अ‍ॅड. गजानन नाईक यांनी आंदोलनांच्या विषयांवर उत्स्फूर्त विचार मांडले. शिक्षिका कु. उषा पोखरे, पालक श्री. सुर्यकांत सतरकर आणि विद्यार्थीनी कु. कल्पिता गडेकर यांनी कॉन्वेंट शाळांमध्ये हिंदु संस्कृतीविरोधी वातावरण कसे असेते याचे अनुभव सांगितले. निदर्शनामध्ये सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन श्री. राहूल वझे यांनी केले. शेवटी श्री. गोविंद चोडणकर यांनी ठराव मांडले.

**आंदोलनामध्ये सहभागी संघटना -** हिंदु जनजागृती समिती, सनातन संस्था, रणरागिणी, हिंदु विधीज्ञ परिषद

आपला नम्र, राष्ट्रीय हिंदू आंदोलनाकरिता, डॉ. मनोज सोलंकी, संपर्क क्र. ९३२६१०३२७८

(छायाचित्रओळ - राष्ट्रीय हिंदू आंदोलनाच्या छत्राखाली फोंडा येथे समस्त हिंदुत्ववादी संघटना हिंदूंना भेडसावणाऱ्या स्थानिक, तसेच राष्ट्रीय समस्यांना अनुसरून निदर्शने करतांना छायाचित्रात दिसत आहे.)